## रे.मु.नं. १७५/२०१० मधील निशाण क्र.१४९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने मयत प्रतिवादी क्र.२ लक्ष्मण कोंडीबा पवार यांचे बाबत पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अजार्त वादीचे कथन असे की, सदर प्रकरणात वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द प्रतिदावा दाखल केलेला असून सदर प्रतिदाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र.२ हे लक्ष्मण कोंडीबा पवार हे दि.०३.०८.२०२१ रोजी कोरोना काळात मयत झालेले आहेत. यातील प्रतिवादी हे कोरोना कालावधीमध्ये मयत झाल्याने, तसेच ते निरक्षर व अशिक्षित असल्यामुळे आणि संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन असल्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र.२ चे वारसांची नावे व पत्ते वेळेत मिळू शकली नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस कायद्याच्या मुदतीत अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र.२ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतलेमुळे प्रतिवादी क्र.२ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. सबब, सदर प्रतिवादी विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणेस वादीस परवानगी मिळणेकामी न्यायाचे व गरजेचे झालेले आहे. प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करण्यात यावा तसेच सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ याने म्हणणे देवून असे कथन केले की, अर्जातील कारण योग्य, खरे व कायदेशीर नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरणात वादीने प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव होवुन,

वाटप होवुन व पृथक कब्जा मिळणेकामी दाखल केलेला आहे, तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणजेच प्रतिदाव्यातील वादीने प्रतिदाव्यातील प्रतिवादीविरुध्द जाहीर ठरावाचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हे दि.०३.०८.२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांचे वारस दाव्याच्या कामी सामील करणे आवश्यक आहे. वादीने प्रतिवादी क्र.२ हे कोरोना कालावधीमध्ये मयत झाल्याने, तसेच ते निरक्षर व अशिक्षित असल्यामुळे आणि संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन असल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र.२ चे वारसांची नावे व पत्ते वेळेत मिळू शकली नसल्याने सदर मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर मुदतीत घेता आले नाहीत असे कारण आपल्या अर्जात नमूद केले आहे. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ वादीने नि.१५० वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच वादीने सदर अर्जातील कथनांच्या पुष्ठ्यर्थ नि.क्र.१३२ वर मयत लक्ष्मण कोंडीबा पवार यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द डिक्लेरेशन, वाटप व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणजेच प्रतिदाव्यातील वादीने प्रतिदाव्यातील प्रतिवादीविरुध्द जाहीर ठरावाचा दावा दाखल केलेला आहे. दाव्यातील व प्रतिदाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.२ यांचे बाबत झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायम स्वरुपी न्यायनिर्णिय होणेकामी प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, त्यामुळे सदरची बाब ही वादीवर आर्थिक भुर्दंड लावून काही अंशी कमी करता येवू शकते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र.१५१ वरील आदेशात नमुद रक्कम प्रतिदाव्यातील वादीने प्रतिवादीस देणेचे अटीवर सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ बाबत झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो, तसेच प्रतिवादी क्र.२ च्या वारसांना अभिलेखावर घेणेस परवानगी देण्यात येते.

दिनांक – १२/१२/२०२४.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:05:23 +0530

(एस.एस. साळुंखे)
३रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.